ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 47037)

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF-YEARLY RESEARCH JOURNAL
ISSN 2278 - 8158

# ROYAL

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Valume-VI, Issue-II
December - May - 2017-18

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

## EDITORIAL BOARD

**Editor : Vinay Shankarrao Hatole**

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head Dept. of Management Studies, University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor and Head (Retdf.), Dept. of Economics, Shivaji University, Kolhapur.

**Dr. Sadique Razaque**
University Dept. of Psychology, Vinoba Bhave University, Hazaribagh, Jharkhand.

**Dr. Uttam Panchal**
Vice Principal, Dept. of Commerce and Management Science, Deogiri College, Aurangabad.

**Dr. Kailas Thombre**
Research Guide and Asst. Prof. Deogiri College Aurangabad.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Dr. Manerao Dnyaneshwar Abhimanji**
Asst. Prof. Marathwada College of Education, Dr. Rafique Zakaria Campus, Aurangabad.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Enviromental Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Kishore Kumar C. K.**
Coordinator Dept. of P. G. Studies and Research in Physical Education and Deputy Director of Physical Education, Mangalore University, Mangalore.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head, Dept. of Psychology, University of Madras.

**Dr. Ganesh S. Chandanshive**
Asst. Prof. & Head of Dept. in Lokkala Academy, University of Mumbai, Mumbai.

**Dr. Rushikesh B. Kamble**
H.O.D. Marathi S. B. College of Arts and Commerce, Aurangpura, Aurangabad. (M.S.)

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy, Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerce, Nizwa College of Technology, Nizwa Oman.



+PUBLISHED BY+

**Ajanta Prakashan**

Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004 (INDIA)
Contact : (0240) 6969427, Cell : 9579260877, 9822620877
E-mail : anandcafe@rediffmail.com, info@ajantaprakashan.com, Website :www.ajantaprakashan.com


Scanned by CamScanner

# CONTENTS


| Sr. No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| १ | जागतिकीकरणातील चंगळवादी संस्कृती<br>**प्रा. डॉ. रामदिनेवार गोविंद शंकरराव** | १-३ |
| २ | शिंदे काळातील मंदिर स्थापत्य व वास्तुकला<br>**प्रा. जायभाये भगवान नाना** | ४-६ |
| ३ | भारतातील उच्च शिक्षणातील विषमतेचा आढावा<br>**डॉ. बी. एस. सावके** | ७-१० |
| ४ | अमृतानुभव : आत्मबोधाची आस जागलेल्यांसाठी संत ज्ञानेश्वरांची सर्वोत्कृष्ट साहित्यकृती<br>**डॉ. राजश्री पवार** | ११-१३ |
| ५ | एक देश, एक निवडणूक<br>**एकनाथ ज्ञानदेव खरात** | १४-१७ |
| ६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर : एक समाजशास्त्र<br>**डॉ.मधुकर चाटसे** | १८-१९ |
| ७ | जुन्नर नगरपरिषदेतील नागरी दलित वस्ती सुधार योजना: एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. राहुल पंडित** | २०-२४ |
| ८ | भौगोलीक माहिती प्रणाली (G.I.S)<br>**प्रा.सरवदे एम. पी.** | २५-२८ |
| ९ | महाडच्या सत्याग्रहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>**श्रीमती.शितल नागनाथ कांबळे** | २९-३१ |
| १० | वडार समाजाच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे अध्ययन<br>**विजय देविदासराव रजाने** | ३२-३४ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - प्रेरणादायी विचारवंत<br>**डॉ. संभाजी पाटील** | ३५-३९ |
| १२ | इंग्रजी भाषिक कौशल्ये विकसनासाठी उपक्रम<br>**नम्रता राधाकृष्ण कुलकर्णी**<br>**डॉ. चिंचोलीकर के. एल.** | ४०-४३ |
| १३ | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि मानवी हक्कविषयक जागतिक घोषणापत्र यांचा तूलनात्मक अभ्यास<br>**प्रा. संजय किशनराव भालेराव** | ४४-५० |


Scanned by CamScanner

७

# जुन्नर नगरपरिषदेतील नागरी दलित वस्ती सुधार योजनाः एक अभ्यास

प्रा. डॉ. राहुल पंडित
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री. शिवछत्रपती महाविद्यालय,जुन्नर.

## प्रस्तावना

आधुनिक काळात लोकशाही हे शासन व्यवस्थेचे सर्वोत्तम स्वरुप असून द्वितिय महायुध्दानंतर अनेक राष्ट्रांनी या शासन प्रकारचा स्वीकार केलेला आहे. या शासन प्रकारात अंतिम सत्ता ही जनतेच्या हाती एकवटलेली असल्याने, काही राष्ट्रांनी शासनपद्धती म्हणून तर काही राष्ट्रांनी जिवनपद्धती म्हणून लोकशाहीचा स्वीकार केला आहे. परंतू जोपर्यंत लोकशाही ही विकेंद्रित स्वरुपातून खालच्या स्तरापर्यंत पोहचणार नाही तोपर्यंत ती निश्चित उद्दिष्टांपासून दुर असेल.या गरजेपोटीच काही राष्ट्रांनी स्थानिक शासनामार्फत लोकशाहीचे पर्यायाने सत्तेचे विकेंद्रिकरण घडवून आणून व सर्वसामान्यांना या प्रकियेत समाविष्ठ करुन घेवून निश्चित ध्येय प्राप्त करुन घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे व भारत त्यापैकीच एक राष्ट्र होय.

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाहीचा स्वीकार केला. लोकशाहीचे विकेंद्रिकरण घडवून आणण्यासाठी केंद्रशासन व राज्यशासनाच्या बरोबरीने स्थानिक शासनाची निर्मिती केली आहे. स्थानिक शासन संस्था ह्या लोकशाहीच्या सर्वोत्तम पाठशाळा आहेत. लास्कीच्या मते , स्थानिक संस्था शासनाच्या इतर अंगापेक्षा जनतेला लोकशाही सुरक्षा प्रदान करतात, नागरीकांच्या विकास कार्यातील पाठशाळा बनतात आणि जनतेला वास्तविक स्वातंत्र्याचे अनुभव प्राप्त करुन देतात. थोडक्यात लोकशाही व्यवस्थेचे आदर्श स्वरुप तेच मानले जाते ज्यात समाजातील खालच्या स्तरापर्यंत लोकशाही संस्थाचा प्रसार केला जातो. भारतातप्राचिन काळापासून ग्रामिण स्थानिक शासन संस्थेचे अस्तित्व बघावयास मिळते. त्याचे दाखले मौर्यकाळ व मोगल काळात सापडतात. तसेच स्थानिक नगर संस्थाचा उल्लेख ही इतिहासात सापडतो. उदा. मोहोजोंदडो व हडप्पा येथिल उत्खननावरुन तेथिल नागरी संस्कृतीची प्राप्त झालेली माहिती. प्राचिन भारतात गणराज्य आणि सिंधु संस्कृती अस्तित्वात होती. त्यावेळी प्रत्येक शहराचा कारभार मंडळाकडून चालविला जात असे.

ब्रिटिश काळात ग्रामपंचायतीचे अधिकार कमी करुन, ग्राम ऐवजी जिल्हा हा स्थानिक प्रशासनाचा घटक ठरविला. ब्रिटिश काळाचा विचार करता स्थानिक नगर शासनाची सुरवात मद्रास नगर निगमाची स्थापना करुन सर्व प्रथम 1687 पासून सुरु झाली.व भारताला स्वातंत्र्य मिळे पर्यंत नगर शासनाचा विकास कमाकमाने झाला आहे. ब्रिटिश शासनाने 1842 मध्ये बंगाल येथे स्थानिक शासनासंबंधिचा कायदा मंजूर केला. त्यानंतर भारतात 1876 ते 1874 या काळात नगर शासना संबंधिचे अनेक कायदे मंजूर केले. वरील कायद्याद्वारे भारतातील नगर पालिका क्षेत्रातील वाढ तसेच निर्वाचन पद्धतीस सुरवात करुन स्थानिक शासनाचा विकास होत गेला. मात्र खऱ्या प्रमाणात लॉर्ड रिपन याने 1882 मध्ये स्थानिक शासना संदर्भात एक प्रस्ताव प्रसिद्ध करुन अमुलाग्र बदल घडवून आणले. त्या प्रस्तावात खालील बाबींचा समावेश होता.

Scanned by CamScanner

1) केवळ प्रशासनासाठीच नव्हे तर जनतेला राजकीय शिक्षण देण्यासाठी स्थानिक शासन संस्थाची निर्मिती केली जात आहे.
2) स्थानिक संस्थाच्या अंतर्गत कार्यात प्रांतिक सरकारांनी हस्तक्षेप करु नये.
3) राज्य असेल त्या ठिकाणी स्थानिक संस्थाच्या सदस्यांची निवड निर्वाचन पद्धतीने केले जावे.
4) स्वतंत्रपणे कार्य करता यावे म्हणून स्थानिक संस्थाना काही उत्पन्नाची साधने सोपवावीत.

या प्रस्तावाप्रमाणे सर्व प्रांतात द्विस्तरीय पद्धती किंवा टु टायर सिस्टम अवलंबिवण्यात आली.लॉर्ड रिपनच्या या योगदानास स्थानिक नगर संस्थाच्या विकासात ऐतिहासीक महत्व प्राप्त झाले.म्हणूनच लॉर्ड रिपनला स्थानिक स्वशासनाचे जनक म्हटले जाते.

त्यानंतर 1916 मध्ये तत्कालिन गव्हर्नर लॉर्ड चेम्सफर्ड यांनी घटनात्मक विकासाच्या दृष्टिने स्थानिक शासनांना महत्व प्राप्त करुन देणारा प्रस्ताव मंजूर करुन घेतला. 1920 ते 1947 च्या काळात स्थानिक शासनाची विशेष प्रगती झाली नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर स्थानिक शासनाचा विकास खऱ्या प्रमाणात झाला. ब्रिटिश राजवटीत स्थानिक शासनास कार्यक्षेत्र, अधिकार, मतदानाचा हक्क या बाबत मर्यादितच अधिकार देण्यात आले होते. या संस्थांना स्वातंत्र्यानंतर पुर्णतः लोकशाही तत्वानूसार पुर्णार्थाने प्रतिनिधीक बनविण्यासाठी व सत्तेचे विकेंद्रिकरण करण्यासाठी भारताने राज्यघटनेत कलम 40 व 246 नूसार घटनात्मक दर्जा प्राप्त करुन दिला. तसेच 1957 साली बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन, समितीच्या अहवालानूसार त्रिस्तरीय पद्धती स्वीकारली व त्यानूसार पंचायतराज नागरी व ग्रामिण भागात विभागली गेली. ग्राम पातळीवर ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या तिन स्तराची निर्मिती केली. नागरी भागात नगरपालिका, महानगरपालिका, बृहन महानगरपालिका अशी त्रिस्तरीय व्यवस्था अस्तित्वात आली.

मुंबई व मराठी भाषा बोलणाऱ्यां प्रदेशाचे मिळुन 1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. राज्य निर्मिती नंतर बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी नूसार महाराष्ट्र शासनाने पंचायतराज व्यवस्थेची रूपरेषा ठरविण्यासाठी श्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली या समितीने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीचा अभ्यास करुन आपला अहवाल शासनास प्रदान केला. त्या अहवालावर विधीमंडळात चर्चा होवून 'महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती' कायदा मंजूर केला. त्यानूसार 1 मे 1962 पासून महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था अंमलबजावणी खाली आली. महाराष्ट्रातील वेगवेगळया प्रदेशाच्या नगरपालिकांच्या कार्यात एकसुत्रता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 1965 मध्ये ' द महाराष्ट्र म्युनिसिपल कौन्सिल, नगरपंचायत् ॲन्ड इंडस्ट्रियल टाऊनशिप्स ॲक्ट' संमत करुन विभागातील वेगवेगळे कायदे व गुंता दुर केला. नंतरच्या काळात वेगवेगळया समित्यांचे गठन करुन त्यात सुधारणा घडवून आणल्या.

राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वानूसार स्थानिक शासनाचा विकास हा राज्य शासनाच्या मदतीवर अवलंबून होता. परंतू सत्तेचे खऱ्या अर्थाने विकेंद्रिकरण घडवून आणण्यात घटकराज्यांनी दाखववलेली उदासीनता, अनियीमत होणाऱ्या निवडणुका, शासनाचे अतिरिक्त नियंत्रण, अपुरी उत्पादनाची साधने, अनाधिकृत बरखास्ती, आशा अनेक कारणांनी स्थानिक शासन संस्था कमजोर बनल्या. व राज्यशासनाने म्हणावे त्याप्रमाणात स्थानिक शासनाकडे लक्ष दिले नाही. खरे तर स्थानिक शासन संस्था संपुर्ण राजकीय व्यवस्थेची क्षमता वाढविण्याचे काम करते. या संस्थेच्या प्रभावी कार्यामुळे अधिकारांचा दुरुपयोग तसेच भ्रष्टाचारास आळा बसतो. लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण होते. केंद्र व राज्य शासनाबद्दलच्या लोकांच्या अपेक्षा कळण्यास मदत होते. एका प्रकारे लोकांना आपले विचार, अपेक्षा व

Scanned by CamScanner

अडीअडचणी मांडण्यास एक विचारपीठ मिळते. परंतू राज्यशासन आपले अधिकार कमी करुन स्थानिक शासनास देण्यास तयार नव्हते.

केंद्रशासनाने पुढाकार घेवून 22 डिसेंबर 1992 मध्ये 73 वी व 23 डिसेंबर 1992 रोजी 74 वी राज्यघटना दुरुस्ती केली.या राज्यघटना दुरुस्तीला अनुसरुन ग्रामिण व नागरी स्थानिक संस्थेसघटनात्मक दृष्टिने सक्षमीकरण केले. या घटनादुरुस्तीनुसार या संस्थांना घटनात्मक संरक्षण प्राप्त झाले. त्यांचा कार्यकाल निश्चित झाला. नियीमत निवडणूका घेण्याचे बंधन राज्यशासनावर आले. अनाधिकृत बरखास्तीचा बडगा नाहीसा झाला. अनुसुचीत जाती–जमातींना, महिलांना राखिव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली. महत्वाचे विषय या संस्थाकडे सोपवली आल्याने आर्थिक स्वायत्ता मिळाली व धोरणे तयार करण्याची व अंमलबजावणीचे अधिकार प्राप्त झाली. या संस्था पुढिल काळात अधिक सक्षमपणे कार्यन्वित झाल्या.

## जुन्नर नगरपरिषद

ब्रिटिश कालखंडात लोकांचा शासनात सहभाग वाढविण्यासाठी मोठ्या शहरात नगरपालिकांची स्थापना करण्यात आली. नंतर ज्या गावाची लोकसंख्या 2000च्या आसपास आसेल तिथे टाऊन नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. जुन्नर नगरपरिषदेची स्थापना शहरातील नागरीकांच्या लेखी मागणी नूसार ब्रिटिश सरकारने सन 1855 मध्ये जुन्नर शहरात नागरी कारभाराकरीता 'डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट 1850' अन्वये नगरपरिषदेची स्थापना केल्याचे जाहीर केले. मात्र प्रत्यक्ष कारभाराची सुरवात 1 मे 1861 पासून झाली.

2001 च्या जनगणने नूसार जुन्नर शहराची लोकसंख्या 24741 होती. यापैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या 1575 एवढी होती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या 1766 एवढी होती. 2011च्या जनगणनेनूसार जुन्नर शहराची लोकसंख्या 25520 एवढी आहे. जुन्नर नगरपरिषदेत 17 नगरसेवक असून त्यापैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी व एक जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे.

शासन निर्णय नगरविकास विभाग क.विघयो 1094/241 प्र. क. 29/नवि–4, दि.24 जानेवारी 1996 या आदेशानूसार महाराष्ट्र नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेची सुरवात केली ही योजना जिल्हास्तर व विशेष घटक लाभार्थी करीता आहे.शासन महानगरपालीका व नगरपरिषदे अंतर्गत या योजनेतून होणा–या कामासाठी 100टक्के अनुदान देते. नगरपालिका क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौद्ध असलेल्या प्रभागामध्ये तसेच इतर प्रभागात 50 टक्के पेक्षा अधिक अनुसुचित जाती तसेच नवबौद्ध यांची लोकसंख्या असलेल्या वस्तीत नागरी सुविधांची कामे हाती घेता येतात.

## संशोधन समस्या

"जुन्नर नगरपरिषदेतील नागरी दलित वस्ती सुधार योजनाः एक अभ्यास हे शीर्षक घेऊन संशोधन कार्य पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये नगरपरिषदेच्या क्षेत्रात राबविल्या जाणाऱ्या दलित वस्ती सुधारणा योजनेची अंमलबजावणी आणि या योजना राबवितांना कोण–कोणत्या अडचणी येतात याचा संशोधनामधून अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनाअंती प्राप्त होणारे निष्कर्ष आणि स्थिती लक्षात घेवून सदर योजना अधिक प्रभावीपणे कशी अंमलबजावणी खाली आणता येईल या करीताच हा अभ्यास विषय निवडला आहे.

## संशोधनाचे उद्दिष्ट्ये

प्रस्तुत शोध प्रबंधाचे उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

1) जुन्नर नगरपरिषदेतील दलित नागरी वस्ती सुधारणा योजनांची माहिती करुन घेणे.

2) या योजनेमुळे सामाजिक स्तरावर झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

Scanned by CamScanner

3) या योजनांची अंमलबजावणी करतांना उद्‌भवणाऱ्या अडचणी व त्रुटी शोधुन समस्यावर योग्य उपाय सुचविणे.

4) या योजनेत दिल्या जाणाऱ्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

5) अनसुचीत जाती (राखीव) जागेवर निवडुण आलेल्या उमेदवाराच्या कार्याची माहीती करुन घेणे.

संशोधनाची गृहितके

प्रस्तुत शोध प्रबंधाचे गृहितके खालील प्रमाणे आहेत.

1) जुन्नर नगर परिषदेत दलित वस्ती सुधारणा योजनेमुळे निश्चित निधी दलित वस्तीतील विकास कामे करण्यासाठी खर्च केला जातो.

2) ही योजना राबवित असतांना नगरसेवक, नगरसेवीकांना प्रशासकीय अडचणी येतात.

3) या योजनेकरीता उपलब्ध झालेला निधी शासनाच्या नियमानूसार खर्च केला जातो.

4) या योजनेची योग्य प्रमाणात अंमलबजावणी झाल्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे.

5) या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे दलितांचा सामाजिक, राजकीय व आर्थिक स्तर उंचावला आहे.

6) विरोधी पक्षातील नगरसेवक व नगरसेविका यांना आपल्या प्रभागात ही योजना राबवित असतांना सत्ताधारी पक्षाकडून राजकीय अडचणी येतात.

संशोधनाचे महत्व

प्रस्तुत संशोधनातुन नागरी दलित वस्ती सुधार योजना या योजनेचे विविध उपलब्ध साधनातून सखोल माहिती प्राप्त झाली आहे त्या माहितीच्या आधारावर या योजनेतून दलित वस्तीत झालेला विकास समजावून घेता आला. दलित समाजाच्या राहणीमानात इतर प्रगत समाजाच्या बरोबरीने सुधारणा झाली आहे किंवा नाही याचीही माहीती प्राप्त झाली आहे. शासनामार्फत दलित समाजाच्या उत्कर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना व विविध उपकमाची माहिती मिळविता आली आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती शासनाने वेळोवेळी नागरी दलित वस्ती सुधार योजना बाबतीत जी मार्गदर्शक तत्वे घालुन देलेली आहेत त्यानुसारच अभ्यास केला आहे.

संशोधनाची मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे जुन्नर नगरपरिषदेतील नागरी दलित वस्ती सुधार योजनेच्या क्षेत्रापुरता अभ्यास मर्यादित आहे. हीच या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन पद्धती

जुन्नर नगरपरिषदेतील नागरी दलित वस्ती सुधार योजनाः एक अभ्यास या अभ्यास विषयाच्या संशोधनासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

सदरील संशोधन प्राथमिक व दुय्यम माहितीवर/तथ्यावर आधारलेले आहे.

निष्कर्ष

आर्थिक वर्ष 1974 पासुन ग्रामिण व आर्थिक वर्ष 1995–96 पासुन नागरी क्षेत्रात दलित भागात राहणाऱ्या लोकांचे जिवनमान उंचावण्यासाठी या योजनेची सुरवात केली आहे. त्या भागात झालेली विकास कामे पाहता काही

Scanned by CamScanner

प्रमाणात ही योजना यशस्वी होतांना दिसत आहे. या संशोधन प्रकल्पांतर्गत केलेल्या संशोधनात निश्चित केलेली संशोधन उद्दिष्ट्ये तसेच गृहितके या आधारावर मागील सर्व प्रकरणांमधून संशोधनाअंती प्रकरण निहाय जे ठोस निष्कर्ष प्राप्त झाले आहेत ते, पुढील प्रमाणे विशद करण्यात आले आहेत.

1) ग्रामिण भागाप्रमाणेच शहरी भागासाठी शासनाची एक बहुकांक्षी योजना म्हणून नागरी दलित वस्ती सुधारणा योजना आहे.

2) शासनाने निर्धारीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन या योजनेची कार्यवाही होतांना दिसते.

3) जुन्नर नगरपालिका क्षेत्रात या योजनेच्या योग्य अंमलबजावणीमुळे दलित वस्त्यांमध्ये विविध कामे पुर्णत्वास गेली आहेत.

4) शहरातील इतर भागाप्रमाणेच दलित वस्त्यातील राहणाऱ्या समाजास सोयीसुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

5) या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी मुळे जुन्नर नगरपालिका क्षेत्रात दलित वस्त्यामध्ये पक्के रस्ते, अंतर्गत गटाराची बांधणी, सार्वजनीक शौचालय, पेव्हिंग ब्लॉक बसविणे, दिव्याची सोय, समाजमंदिराचे काम इ. महत्वपुर्ण कामे झालेली आहेत.

6) शासनामार्फत या योजने अंतर्गत दरवर्षी निधि उपलब्ध होतो त्याचा विनियोग जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली होतो.

7) ही योजना राबवित असतांना अनुसुचित जातीचा नगरसेवक पाठपुराव्यानिशी दलित वस्तीतील ज्या भागात कामाची जास्त गरज आहे तेथिल कामास प्राधान्य देण्याची भूमिका घेतांना दिसतो.

8) तुलनात्मक स्थिती पाहता असे लक्षात आले की, या योजनेच्या योग्य अंमलबजावणी पुर्व परिस्थिती व आताची परिस्थिती यात मोठा फरक जाणवतो.

9) या योजने अंतर्गत पायाभूत सेवा सुविधांची उपलब्ध्ता झाली.

## संदर्भ

1) डॉ. जोरगुलवार भुषण शहापूरकर,(1999), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, प्रकाशक–लक्ष्मणराव शहापूरकर, लातूर.

2) मोळे भा. ल., 2003, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

3) जुन्नर नगर परिषद शतकोत्तर सुवर्ण महोत्सव, स्मरणिका सन 1861–2011.

4) शासन निर्णय नगरविकास विभाग क.विघयो 1094/241 प्र. क. 29/नवि–4, दि.24 जानेवारी 1996.

5) पाटील वा.भा., (2012), संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

Scanned by CamScanner